

# बुद्धाची गोष्ट


प्रभाकर गोरे

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बालवा
दा. क्र. ८९८९

IRBK-0108141

© प्रभाकर गोरे

पहिली आवृत्ति
११ मे, १९६०
बुद्ध पौर्णिमा १८८२



मुद्रक : बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : ग. रा. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

आईवडिलांच्या चरणीं...



# बुद्धाची गोष्ट

माझ्या छोट्या मित्रमैत्रिणींनो, आज मी तुम्हांला भगवान बुद्धांची गोष्ट सांगणार आहें. यांना भगवान कां म्हणतात माहीत आहे ? भगवान विष्णूंनीं पृथ्वीवरील दुष्टपणा नाहींसा करण्यासाठीं जे दहा अवतार घेतले ना, त्यांमधील नववा अवतार बुद्धाचा होता असें मानतात. आतां कळलं बुद्धांना भगवान कां म्हणतात तें ?

फार फार पूर्वी म्हणजे जवळ जवळ अडीच हजार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. नेपाळ आणि हिंदुस्थान हे देश जिथें एकमेकांना मिळतात तिथें कपिलवस्तु नांवाचें एक सुंदर शहर होतें. तिथल्या राजाचें नांव शुद्धोदन. शाक्य कुळांत जन्मलेल्या या क्षत्रिय राजाला होत्या दोन राण्या. मोठीचें नांव मायावती आणि धाकटीचें प्रजापती गौतमी. मायावती आणि प्रजापती या दोघी सख्ख्या बहिणीबहिणी. खूप वर्षें झालीं तरी राजाला मूलबाळ नव्हतें. त्यामुळें राजाला व त्याच्या दोन्ही राण्यांना फार फार वाईट वाटे. घरांत लहान मूल असावें, त्यानें खेळावें, दंगामस्ती करावी, खूप खूप शिकावें, मोठें व्हावें आणि आपल्यामागून राज्य करावें अशी राजाची फार इच्छा. ती इच्छा कधींतरी देव पुरी करणार होता का ?

पण एक दिवस निराळा उजाडला. त्या दिवशीं राणी मायावतीला चैन पडलें नाहीं. मात्र रात्रीं पलंगावर पडल्याबरोबर राणीला झोप लागली. झोपेंत राणीला एक मोठें अद्भुत स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत राणी एका सोनेरी पर्वताच्या पायथ्याशीं झोंपली होती. कसल्यातरी आवाजानें ती जागी झाली. तिनें पाहिलें तर त्या पर्वतावरून एक शुभ्र पांढरा हत्ती तिच्याकडे येत होता. त्याच्या सोंडेंत कमळाचें फूल होतें. खालीं येतां येतां तो जेव्हां तिच्या जवळ येऊन पोंहोचला तेव्हां त्याची वाफ होऊं लागली आणि शेवटीं ती सर्व वाफ राणीच्या अंगांत मिसळून गेली.

दुसऱ्या दिवशीं राणीनें हें चमत्कारिक स्वप्न राजाला सांगितलें. राजाला या स्वप्नाचा अर्थ कळेना. त्यानें विद्वान पंडितांना बोलाविलें आणि स्वप्नाचा अर्थ विचारला. ते म्हणाले, "राजा, तुझ्या राणीला लवकरच मुलगा होणार आहे. हा मुलगा जर राज्यावर बसला तर पृथ्वीवरील सर्वांत मोठा राजा होईल. पण या मुलाच्या दृष्टीस जगांतलीं दुःखें पडलीं तर तो संसारांतून दूर जाईल व साधू बनेल. त्याला जगाचें सर्व ज्ञान होईल. सर्वजण त्याला 'बुद्ध' म्हणजे ज्ञानी पुरुष असें म्हणतील! असा या स्वप्नाचा अर्थ आहे."

राजानें उत्तर दिलें, "मी तर क्षत्रिय आहें. माझा मुलगा माझ्यासारखाच शूर होणार आणि राजा होऊन प्रजेला सुख देणार. तो साधू होणें शक्यच नाहीं!" राजानें उघड जरी असें म्हटलें तरी मनांतून मात्र त्याला भीति वाटत राहिली कीं, माझा मुलगा साधू झाला तर? राजानें मनाशीं ठरविलें कीं आपल्या मुलाला दुःख दिसणारच नाहीं अशी व्यवस्था करावयाची. मग कसा तो साधू होईल?

कांहीं महिन्यांनीं राणीला एक गोंडस मुलगा झाला. सगळीकडे आनंदी आनंद झाला. राजा तर हर्षानें नाचूं लागला. राजाची खूप दिवसांची इच्छा आतां पुरी झाली होती. राजानें आपल्या मुलाचें नांव 'सिद्धार्थ' म्हणजे 'इच्छा सिद्ध करणारा' असें ठेवलें.


सिद्धार्थाच्या नशिबांत आईचा सहवास नव्हता. त्याचा जन्म होऊन सात दिवस झाले नाहींत तोंच त्याची आई मायावती देवाघरीं गेली. मुलगा झाल्यामुळें राजा आनंदांत होता तो एकदम दुःखी झाला. पण मायावती गेली म्हणून काय झालें? तिची बहीण प्रजापती तर होती ना? तिनें सिद्धार्थाला फुलासारखा संभाळला. "माय मरो पण मावशी जगो" ही म्हण तिनें खरी केली.

दिवसांमागून दिवस गेले. सिद्धार्थ मोठा होऊं लागला. त्याला विश्वामित्र नांवाच्या ऋषींनीं सर्व विद्या शिकविल्या. घोड्यावर बसणें, बाण मारणें वगैरेमध्यें तो अतिशय निपुण झाला.

आणखी कांहीं वर्षें गेलीं. सिद्धार्थ आतां वयांत आला. त्याला दुःख होऊं नये म्हणून शुद्धोदन राजा खूप काळजी घेई. त्यानें सिद्धार्थाकरितां एक सुंदर राजवाडा बांधला होता व त्यांत सर्व सुखसोयी ठेवल्या होत्या. त्या राजवाड्यांत मुली नाच-गाणीं करून सिद्धार्थाचें मन रमवीत. पण हे सर्व ऐषआराम भोगूनही कधींकधीं तो एकदम गंभीर होई. एकटाच बागेंत जाऊन विचार करीत बसे. त्याला काय पाहिजे आहे हें कुणालाच कळत नसे.

राजा शुद्धोदनाला जेव्हां ही गोष्ट समजली तेव्हां तो फार अस्वस्थ झाला. राणीला पडलेल्या स्वप्नाचा अर्थ त्याला आठवला. सिद्धार्थाचें लग्न करून दिलें तर तो संसारांत रमेल व आनंदांत राहील असें त्याला वाटलें. त्याप्रमाणें तो तयारीस लागला.

त्याच वेळीं सुप्रबुद्ध नांवाच्या राजानें आपल्या मुलीचें स्वयंवर मांडलें होतें. या मुलीचें नांव यशोधरा. यशोधरा जशी सुंदर होती तशीच बुद्धिमान पण होती. जो कोणी रथांची शर्यत जिंकेल त्यास यशोधरा द्यावयाची असा सुप्रबुद्धाचा



पण होता. शुद्धोदनाला हें कळलें तेव्हां त्यानें सिद्धार्थास स्वयंवरास पाठविलें. सिद्धार्थाला यशोधरा पहिल्या भेटींतच फार आवडली. स्वयंवरास जमलेल्या सर्व राजपुत्रांच्या रथांना मागें टाकून सिद्धार्थानें आपला रथ पहिला आणला. यशोधरेच्या हातांतील माळ सिद्धार्थाच्या गळ्यांत पडली.

थोड्याच दिवसांत सिद्धार्थ व यशोधरा ह्यांचें लग्न झालें. नव्या राजवाड्यांत तीं दोघें सुखानें राहूं लागलीं. यशोधरेच्या संगतींत सिद्धार्थ पुरा रमलेला दिसे. तें पाहून शुद्धोदनाची भीति बरीच कमी होई.

कांहीं दिवस गेले. सिद्धार्थाला सारखें राजवाड्यांत राहून राहून कंटाळा आला होता. एके दिवशीं त्यानें वडिलांना विचारलें. " पिताजी, मी जरा आपल्या कपिल-वस्तु शहरांतून हिंडून येऊं का ? "

राजानें लगेच संमति दाखविली.

पण मग राजाच्या मनांत आलें कीं समजा रस्त्यांत सिद्धार्थाला, दुःखी, गरीब, आजारी लोक दिसले तर ? राजाला पुन्हा भीतीनें घेरलें. त्यानें शहरांत दवंडी पिटविली कीं राजपुत्राचा रथ राजरस्त्यावरून जाईल त्या वेळीं सर्व लोकांनीं छान छान कपडे करून राजपुत्राचें स्वागत करावें. कोणींही तोंडावर दुःख दाखवूं नये. गरीब, दुःखी, आजारी, रोगी लोकांनीं त्या दिवशीं राजरस्त्यावर उभें राहूं नये.

राजाची ही आज्ञा लोकांनीं मोठ्या आनंदानें पाळली. सुंदर सुंदर कपडे करून, मौल्यवान दागिने घालून श्रीमंत लोक तयार झाले. ज्या रस्त्यानें राजपुत्र जाणार होता त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंस हसतमुखानें उभे राहिले.

सोनेरी रथांत उभा राहून सिद्धार्थ रस्त्यानें फिरला. लोकांचे नमस्कार घेत चालला. सगळीकडे आनंदच आनंद भरला आहे असें त्याला वाटलें. प्रजेविषयींच्या प्रेमानें त्याच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें. पण दुसऱ्याच क्षणाला तो एकदम गंभीर झाला. हें सर्व खोटें तर नाहीं ना ? अशी शंका त्याच्या मनांत आली. कुणीतरी आपल्याला फसवीत आहे असें त्याच्या मनानें घेतलें.

" छंदका, मला दुसऱ्या रस्त्यानें घेऊन चल ! " तो सारथ्याला म्हणाला.

" नको महाराज, दुसऱ्या रस्त्यानें जाण्यास मला शुद्धोदन महाराजांची परवानगी नाहीं ! " छंदक नम्रपणें उत्तरला.

" पण मी तुला ने म्हणतों ना ! "

सिद्धार्थाचा आवाज एखाद्या फसविलेल्या मुलासारखा चिडखोर झाला होता. छंदकानें नाइलाजानें दुसऱ्या रस्त्याला रथ वळविला.



सिद्धार्थाला त्या रस्त्यावर प्रथम काय दिसलें ?

एका भिंतीच्या कडेला एक क्षयरोगी पडला होता. त्याच्याकडे अगदीं बघवत नव्हतें. नुसतीं हाडें उरलीं होतीं — डोळे मृत्यूची वाट पाहत होते.

सिद्धार्थ रथांतून खालीं उतरला. त्या क्षयरोग्याचे हाल सिद्धार्थाला बघवेनात. सिद्धार्थ आणखी चार पावलें पुढें गेला.



आणि त्याला एक भिकारी दिसला. भुकेनें तो खंगला होता. काठीच्या आधारानें तो कसातरी उभा राहिला होता. पाठींत वांकला होता.

सिद्धार्थाचे डोळे भरून आले. एवढें दुःख, एवढी गरिबी, एवढी कुरूपता जगांत कां असावी, तें त्याला कळेना. तो जरा बाजूला वळतो तोंच चार माणसें एक

प्रेत घेऊन जातांना त्याला दिसलीं. सिद्धार्थाला वाटलें– जिवंतपणीं सुंदर दिसणारा माणूस मेल्यानंतर एवढा विद्रूप कसा दिसतो? कायम सुंदर दिसणारी अशी एखादी-तरी गोष्ट या जगांत आहे काय?


सिद्धार्थाला आतां कांहीं सहन होईना. राजवाड्यांत जाण्याकरितां तो परत फिरला. त्याला एक संन्यासी दिसला. त्याच्या एका हातांत काठी होती व दुसऱ्या हातांत भिक्षा मागण्याचें भांडें होतें.

"आपण कोण?" सिद्धार्थानें जवळ जाऊन विचारलें.

"मी संन्यासी आहें. खऱ्या सुखाचा शोध लागावा म्हणून सर्व ऐषआराम टाकून देऊन रानावनांतून फिरत आहें!" संन्यासी म्हणाला.

सिद्धार्थ गंभीर होऊन राजवाड्यांत परत आला. राजा शुद्धोदन त्याचीच वाट पाहत होता. सिद्धार्थ आल्या-





बरोबर त्याला राजानें पेढे दिले. कसले ते पेढे? यशोधरेला मुलगा झाला त्याचे! मुलगा झाल्याच्या आनंदानें सिद्धार्थाचा गंभीरपणा क्षणभर दूर झाला. सिद्धार्थानें आपल्या मुलाचें नांव ठेवलें "राहुल."

त्या रात्रीं सिद्धार्थाला मुळींच झोंप आली नाहीं. रस्त्यावर पाहिलेलीं तीं चार दृश्यें सारखीं त्याच्या डोळ्यांपुढें येत होतीं. त्या संन्याशाचे शब्द सारखे त्याच्या कानांत घुमत होते. खऱ्या सुखाचा शोध लागावा म्हणून सर्व ऐषआराम टाकून मी रानावनांत फिरत आहें. सिद्धार्थाला तरी काय पाहिजे होतें? त्याला पण खऱ्या सुखाचा शोध लावावयाचा होता. खाणें, पिणें, ऐषआराम ह्यांपासून मिळणारा आनंद तेवढ्यापुरता टिकतो. सिद्धार्थाला तसला आनंद नको होता. त्याला कायम टिकणारें सुख पाहिजे होतें. जगांत एवढें दुःख कां ह्याचें त्याला उत्तर पाहिजे होतें.

पहांट झाली. सिद्धार्थाच्या मनाचा निश्चय झाला होता. मावशी, वडील, बायको, मुलगा या सर्वांना सोडून तो जाणार होता. रानावनांतून फिरणार होता. तपश्चर्या करून ज्ञान मिळविणार होता. बुद्ध बनणार होता. विद्वान् पंडितांनीं सांगितलेलें भविष्य अशा रीतीनें खरें ठरणार होतें.


आणि शेवटीं त्या रात्रीं सिद्धार्थ घराबाहेर पडला. जाण्यापूर्वी तो यशोधरेच्या महालांत गेला. यशोधरा राहुलला कुशींत घेऊन शांत झोंपली होती. तिच्या अंगावरून एकदां हात फिरवावा, राहुलला एकदां जवळ घ्यावें असें त्याला खूप वाटलें पण त्यानें आपल्या

मनाला आवरलें. पुढें केलेला हात मागें घेतला. कोणालाही न कळवितां तो गेला.

सिद्धार्थ निघाला तो पायीं प्रवास करीत करीत दूर रानांत गेला. त्यानें अन्नपाणी सोडलें. उपवासानें तो इतका थकला कीं त्याला इकडून तिकडे हलतां देखील येईना. पण तरी त्याला ज्ञान होईना. शेवटीं त्याला कळून आलें कीं उपवास करण्यानें ज्ञान मिळत नाहीं. नंतर त्यानें एका पिंपळाच्या झाडाखालीं बसून तपश्चर्येस सुरुवात केली. मनांत येणाऱ्या उलटसुलट विचारांनीं त्याला पहिल्यांदा



खूप त्रास दिला पण सरतेशेवटीं त्याचें मन शांत झालें. त्याला हवा होता तो अर्थ कळला. त्याची खात्री झाली कीं आपल्याला कुठलेंही दुःख होतें तें अज्ञानानें होतें. आपल्याला ताप आला तर तो ताप कशानें आला व त्यावर औषध काय या गोष्टी जर आपल्याला माहीत नसतील तर ताप बरा होणार नाहीं पण दुःख मात्र वाढेल. म्हणून अज्ञान नाहींसें करून ज्ञान मिळविणें हाच कायम सुखाचा मार्ग आणि सर्व दुःखांवर उपाय आहे. आपल्याला मिळालेलें हें अमोल ज्ञान आपण लोकांना सांगावें, त्यांना दुःखांतून मुक्त करावें, असें याच्या मनानें घेतलें. सिद्धार्थ



सर्व भारत देशांत व्याख्यानें देत फिरला. त्याचें म्हणणें सर्वांना पटलें व लोक त्याला 'बुद्ध' म्हणजे ज्ञान झालेला असें म्हणूं लागले. भगवान बुद्धांचें नांव सर्वांना माहीत झालें.

एकदां एका गांवीं बुद्ध व्याख्यान देत होते. त्यांचे विचार ऐकण्यासाठीं खूप माणसें जमलीं होतीं. कपिलवस्तु शहरांतील एक व्यापारी पण त्यांमध्यें होता. त्यानें बुद्धांस, म्हणजेच पूर्वीच्या सिद्धार्थास, लगेच ओळखलें. त्यानें राजा शुद्धोदनाला येऊन सर्व सांगितलें. राजानें लगेच दूतांकरवीं निरोप पाठवून बुद्धांना एकदां कपिलवस्तूस येऊन जाण्याची विनंती केली. वडिलांच्या विनंतीस मान देऊन बुद्ध आले.


बुद्ध आले. राजा, राणी प्रजापती, सारीं सारीं त्यांना भेटलीं. पण यशोधरा? यशोधरा कुठें होती? तिला बुद्ध आलेले कळलें नाहीं कीं काय?

तिला सारें कळलें होतें. बुद्ध तिला न कळवितां सोडून गेले म्हणून तिचा बुद्धांवर राग होता. बुद्धांनीं स्वतः आपल्याला भेटायला यावें अशी तिची इच्छा होती. बुद्धांना तें आपोआप कळलें. बुद्धांचीं पावलें यशोधरेच्या महालाकडे वळलीं. भिंतीशीं उभ्या असलेल्या यशोधरेनें कोण आलें म्हणून मागें वळून पाहिलें मात्र ... आणि तिचा राग गेला. तिनें चटकन् बुद्धांचे पाय धरले. राहुलला प्रथमच त्याचे बाबा भेटले!

बुद्धांनीं सांगितलेलें सत्य सर्वांनाच पटण्यासारखें होतें. राजा, राणी प्रजापती, यशोधरा, राहुल हे सर्व त्यांचे शिष्य झाले. बुद्ध कपिलवस्तूमध्यें तीन महिने राहिले. तेवढ्या वेळांत खूप लोक शिष्य झाले.


त्यांच्या सर्व शिष्यांनीं जगभर प्रवास केला. नवा बौद्धधर्म लोकांना समजावून सांगितला.

काय बरें होतें या नव्या बौद्धधर्मांत? साध्या गोष्टी होत्या. कोणालाही कळतील, कोणालाही पटतील अशा. गरीब मुक्या प्राण्यांवर दया करावी, कोणालाही ठार मारूं नये, हिंसेनें हिंसा वाढते, जातिभेद मानूं नयेत, हा ब्राह्मण, तो मराठा, हा महार असा भेद करूं नये. खोट्या सुखांच्या नादीं लागून दुःखांत राहूं नये. ज्ञान हाच एक सुखाचा मार्ग आहे. जन्माला येतांना प्रत्येकजण सारखाच असतो.


Goray

परमेश्वरापाशीं हा उच्च, हा नीच, हा हिंदु, हा मुसलमान असा भेद नाहीं. पटतात कीं नाहीं या सगळ्या गोष्टी !

या पुढील आपलें सर्व आयुष्य भगवान बुद्धांनीं या पवित्र विचारांचा प्रसार करण्यांत घालविलें. वयाच्या ८० व्या वर्षीं बुद्ध निर्वाणाला गेले म्हणजे मरण पावले. भगवान बुद्ध गेले पण त्यांचे विचार अमर राहिले आहेत. आणि जोंपर्यंत जगांत दुःखें राहणार, युद्धें होणार, हायड्रोजन बॉम्बसारखीं शस्त्रें तयार होणार, काळा–गोरा, उच्चनीच हे भेद कायम राहणार तोंपर्यंत तुमच्या माझ्या सारख्यांना भगवान बुद्धांच्याच ह्या विचारांचा मोठा आधार वाटणार !



IRBK-0108141